Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - V

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समीक्षेचा वयापक दृष्टिकोन : संदर्भलक्ष्यी समीक्षा<br>डॉ. कैलास अंभुरे | १-११ |
| २ | साहित्यसौंदर्याची तत्वे (सूचकता व व्यामिश्रता)<br>प्रा. अनुराधा मनोहर मोरे (मधुरा जनार्दन सोनवणे) | १२-१७ |
| ३ | तौलनिक साहित्य समीक्षेची सैध्दांतिक मांडणी<br>अरुणा माणिक गायकवाड | १८-२३ |
| ४ | मार्क्सवादी साहित्य समीक्षा : स्वरुप व आकलन<br>डॉ. अतुल मधुकरराव देशमुख | २४-२७ |
| ५ | जनवादी साहित्य समीक्षा<br>भाग्यशाली लेखराज कांबळे | २८-३२ |
| ६ | तौलनिक साहित्याभ्यास आणि तौलनिक साहित्यसमीक्षा<br>डॉ. भरत जाधव | ३३-४२ |
| ७ | साहित्यसमीक्षेची उद्दिष्टे आणि कार्ये<br>प्रा. डॉ. सुशील प्रकाश चिमोरे | ४३-४७ |
| ८ | काव्यात्म साहितय समीक्षा<br>ज्ञानेश्वर अशोक तिखे | ४८-५१ |
| ९ | नव्या साहित्य प्रवाहाराच्या शोधातील मराठी समीक्षा<br>डॉ. प्रदीप औजेकर | ५२-५६ |
| १० | शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा मानुषता सिद्धान्त : एक वाचन<br>डॉ. मनीषा खैरे | ५७-६३ |
| ११ | समीक्षा संकल्पना आणि मानसशास्त्रीय समीक्षा<br>प्रा. हरिभजन राम कांबळे | ६४-६८ |
| १२ | मार्क्सवादी समीक्षा : एक शोध व बोध<br>डॉ. हरिदास आखरे | ६९-७१ |
| १३ | ग्रामीण कवितेची समीक्षा : विशेष संदर्भ ''बोलावे ते आम्ही'' या संग्रहातील आधुनिकता<br>डॉ. जिजा शिंदे | ७२-७८ |
| १४ | आदिवासी साहित्य समीक्षा : एक दृष्टीकोन<br>प्रा. नागनाथ करडे | ७९-८२ |
| १५ | स्त्रीमनात आत्मविश्वास पेरणारी कविता : 'आभाळ अंतरीचे'<br>प्रा. डॉ. मारोती द. कसाब | ८३-८८ |


TAL. BHADGAON DIST. JALGAON 424 105

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ४. मार्क्सवादी साहित्य समीक्षा : स्वरुप व आकलन

डॉ. अतुल मधुकरराव देशमुख
मराठी विभाग, सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव, जि. जळगाव.

**प्रस्तावना**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मार्क्सवादी साहित्य समीक्षेचे स्वरुप स्पष्ट करावयाचे असून तिचे आकलन मांडायचे आहे. त्यादृष्टीने सर्वप्रथम 'मार्क्सवाद' ही सैद्धांतिक विचारधारा समजून घेणे आवश्यक ठरते.

**मार्क्सवाद**

मार्क्सवाद हा एक महत्त्वाचा सैद्धांतिक विचारप्रवाह आहे. जगाबद्दलची आणि या जगाचा भाग असलेल्या मानवी समाजाबद्दलची सर्वसाधारण विचारसरणी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्य व उत्तर काळात जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स याने फ्रेडरिक एंगल्स याच्या साहाय्याने या विचारसरणीची मांडणी केली. म्हणून तिला 'मार्क्सवाद' असे म्हटले जाते.

मार्क्सवादात अर्थशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे असले तरी मार्क्सने केवळ अर्थशास्त्रावरच लिहिले, असे नाही. तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, धर्म, कला व साहित्य या समाजजीवनाच्या सर्वच महत्त्वाच्या अंगांवर मार्क्सने लिखाण केले आहे. समाजजीवनाला अनेक अंगे असतात. त्यांचा एकमेकांशी परस्परपूरक संबंध असतो. अभ्यासाच्या सोयीसाठी समाजजीवनाचे वेगवेगळे भाग केले जातात.

मानवी समाजाची रचना अशीच का आहे, ती का बदलते आणि भविष्यकाळात मानवी समाज आणखी कोणकोणत्या बदलांना सामोरा जाणार आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम मार्क्सवादात मार्क्स व एंगल्स यांनी केले आहे.

मार्क्सने भांडवलशाहीच्या आर्थिक सिद्धांताची मांडणी केली. या सिद्धांताबद्दलच मार्क्स विशेष प्रसिद्ध आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याच्या आर्थिक सिद्धांतापासून त्याच्या ऐतिहासिक व सामाजिक सिद्धांतांना वेगळे करता येणार नाही.

मानवाचे आर्थिक जीवन ही मार्क्सवादी विचारसरणीच्या दृष्टीने मूलभूत बाब आहे. मानवाच्या आर्थिक जीवनाविषयी विश्लेषण करताना मार्क्सने 'पाया आणि इमला' (base and superstructure) हा सिद्धांत मांडला. मानवी जीवनात त्याची आर्थिक रचना हा त्याचा 'पाया' (base) असतो. या आर्थिक रचनेवर धर्म, तत्त्वज्ञान, कला, संस्कृती, नीती, कायदेव्यवस्था, राजकारण, समाजकारण, साहित्य, अशी समाजाची सर्व अंगे आधारलेली असतात. ही सर्व अंगे म्हणजेच इमला (superstructure) होय. साहित्य हा या इमल्याचा महत्त्वाचा भाग आहे.

COLLEGE, BHADGAON TAL. BHADGAON DIST. JALGAON 424 105

Scanned with CamScanner

**मार्क्सवादी साहित्य समीक्षा : स्वरुप व आकलन**

मार्क्सवादी साहित्य समीक्षेलाच मार्क्सवादी साहित्यविचार किंवा मार्क्सवादी साहित्य सिद्धांत असेही संबोधले जाते. हा साहित्यविचार मार्क्सच्या साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे. साम्यवाद हे मानवी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, साहित्यिक अशा सर्व अंगांना स्पर्श करणारे तत्त्वज्ञान आहे.

मार्क्सवादी साहित्य समीक्षेची निर्मिती १. कार्ल मार्क्स व फ्रेडरिक, एंजेल्स यांनी केलेले लिखाण आणि २. त्यांच्यानंतर मार्क्सवादी विचारवंतांच्या लेखनातून विकास पावलेल्या साहित्यविषयक संकल्पना, यातून झालेली आहे. साहित्यविचार हा मार्क्स व एंगल्स यांच्या लिखाणाचा विषय नव्हता. त्यांनी केलेले साहित्यविषयक लेखन हे सुद्धा तितकेसे भरीव म्हणता येईल असे नाही. त्यांच्या आर्थिक, सामाजिक विचारांमधूनच साहित्य आणि संस्कृती, साहित्य आणि माणूस यांच्या परस्पर संबंधांविषयी निश्चित विचार झालेला दिसतो. मार्क्स व एंगल्स यांनी केलेले साहित्यविषयक लेखन अनुषंगिक आहे.

मार्क्सवादी साहित्य समीक्षा ही जीवनवादी समीक्षा आहे. शोषीत पीडितांच्या बाजूने उभेअसणाऱ्या साहित्याला ही समीक्षा महत्त्वाचे मानते; तर त्यांच्या हिताविरुद्ध जाणारे साहित्य हे प्रतिगामी आहे, असे मानणारी ही समीक्षापद्धती आहे. साहित्यातून क्रांतीकारी विचार मांडला जावा, असे या समीक्षापद्धतीला अभिप्रेत आहे. साहित्यातील आशय व अभिव्यक्ती यांच्यामध्ये एकता असावी याचाही विचार या पद्धतीत केला जातो. मार्क्सवादी साहित्य समीक्षापद्धतीनुसार साहित्य हे स्वायत्त व समाजाभिमुख असावे. कारण साहित्य ही केवळ सौंदर्यवस्तू नसून ती एक सांस्कृतिक घटनासुद्धा असते. या समीक्षा पद्धतीच्या मते, साहित्य हे काही वास्तवाचे प्रतिबिंब नाही तर ते मानवी जीवनावर केलेले भाष्य असते. तसेच ती नवनिर्मितीही असते.

मार्क्सवाद्यांमधील पहिला महत्त्वाचा विचारवंत म्हणजे जॉर्ज प्लेखानोफ हा होय. कलेची स्वायत्तता मानणारा प्लेखानोफ जीवनाची पुनर्निमिती हे कलेचे कार्य मानतो. सौंदर्यकल्पना ही बदलणारी असून आशय (Idea) आणि रुप (form) यांच्यातील सुसंवाद हेच साहित्याच्या यशाचे गमक आहे असे त्याचे म्हणणे आहे. तर दुसरा महत्त्वाचा मार्क्सवादी विचारवंत लेनिनच्या म्हणण्याप्रमाणे साहित्याने सत्याचे दर्शन घडवावे. यासाठी साहित्यिकाला जीवनप्रक्रियेची जाण असणे आवश्यक आहे. सत्य कितीही अप्रिय व विदारक असले तरी तेच कलेच्या पातळीवर सुंदर ठरते. साहित्यिक अध्यात्मवादी आहे की भौतिकवादी आहे यावर त्याच्या साहित्याची श्रेष्ठकनिष्ठता अवलंबून असते. साहित्यात ज्ञान आणि सौंदर्य यांचा मिलाफ झालेला असावा. लेनिन म्हणतो की, क्रांतिकारी जाणिव आणि अंतर्विरोध यांच्यामधून प्रगत होणाऱ्या वास्तवाचे सखोल चित्रण हे साहित्याचे कार्य आहे.

अँटोनियो ग्रामश्ची याने 'हेजिमनी'चा प्रभुत्वाचा सिद्धांत मांडून मार्क्सवादात महत्त्वाची भर घातली आहे. ग्रामश्चीच्या मते, आपल्या सत्तेला स्थैर्य देण्यासाठी सत्ताधीश वर्गाला समाजाच्या जाणिवांना बदलावे लागते. ग्रामश्ची वर्चस्व आणि प्रभुत्व या कल्पनांमध्ये फरक करतो. वर्चस्व हे दमनाने साध्य केले जाते, तर प्रभुत्वामध्ये लोकांच्या जाणिवांना सोयिस्कर आकार दिला जातो. पहिल्यातील वर्चस्व सक्तीचे असते, तर दुसऱ्यातील संमतीचे. उदा. दक्षिण आफ्रिकेत युरोपीय वसाहतवाद्यांनी वंशीय



Scanned with CamScanner

ARTS, COMMERCE & SCI. COLLEGE, TAL. BHADGAON DIST. JALGAON 424 105